Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पात्रतेसंदर्भात सूचना

जा.क्र./शि.वि.को./सी.डी.ओ.ई./ 01

दि. 01 JAN 2026

**संदर्भ : - जा.क्र.शिवाजी वि./सी.डी.ओ.ई./१९८ दि.१५.११.२०२५**

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम. एम.ए. (भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी,), एम.ए. (सामाजिक शास्त्रे : इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी आपल्या अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर केलेले आहेत. आपल्या केंद्राच्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश व परीक्षा अर्जासोबत पात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे दि.१५/१२/२२५ पर्यत सादर करणेबाबत व पात्रतेच्या सद्यस्थितीचा तपशील (कन्फर्म पात्रता व प्रोव्हीजनल पात्रता) बाबत उपरोक्त संदर्भानुसार कळविण्यात आले होते (सोबत संदर्भिय सूचना माहितीस्तव जोडली आहे) तथापि काही विद्यार्थ्यांनी याबाबतची कागदपत्रे (संस्थातर दाखला (टी.सी.)/स्थलांतर दाखला (एम.सी.), दुहेरी पदवी अर्ज व शुल्क) अद्यापि या केंद्राकडे सादर केलेली नाहीत

याबाबत सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील पात्रता संदर्भातील सद्यस्थिती तपशील विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असून ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अंतिम झालेली नाही अशा विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासकेंद्रावर अथवा या केंद्राच्या मुख्यालयात आपण प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमांची पात्रता ( कन्फर्म ) अंतिम करणेसाठी विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे **दि.१५/०१/२०२६** पर्यंत केंद्रावर सादर करावीत. **जे विद्यार्थी पात्रतेसंदभातील कागदपत्रे सादर करणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांची पात्रता प्रोव्हीजनल असल्यामुळे त्यांचे निकाल परीक्षा विभागामार्फत राखीव ठेवण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

Bhinde
उपकुलसचिव

प्रत : -
१) मा.संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
२) सहाय्यक कुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
३) कक्ष अधिकारी,
४) सर्व संबंधित समन्वयक, विभागीय समन्वयक व हंगामी सहाय्यक प्राध्यापक,
५) सर्व संबंधित प्रशासकीय सेवक
६) सर्व केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण अभ्यास केंद्रे

(याबाबत सर्व संबंधित घटकांनी आवश्यक तो पाठपुरावा करून सदरची पूर्तता होणेबाबत कार्यवाही करावी. )